MHAU020066672022

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१९१९/२०२२ वसुंधरा –*वि*– शासन

## निशाणी २८ वरील आदेश

प्रस्तुत अर्ज हा गैरअर्जदार क्र.२ तर्फे त्यांचेविरुध्दचा 'उलटतपास नाही' आदेश खारीज करण्यासाठी केला आहे.

२. प्रस्तुत अर्ज, त्याबाबत अर्जदार पक्षाचे नि.३० चे लेखी म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले.

३. अर्जदार–गैरअर्जदाराचे म्हणणे असे की, तो या प्रकरणातील प्रतिवादक असुन त्याना या प्रकरणामध्ये ऑनलाइन दाखल कागदपत्रे व अर्ज दिसत नसल्याने उलटतपासासाठी प्रकरण नेमल्याचे माहित नसल्यामुळे तो घेता आला नाही, सबब प्रस्तुत अर्ज मंजुर करावा. अर्जदार पक्षाने त्यास आक्षेप घेतला असुन अर्जदार ही ज्येष्ठ नागरीक असून गैरअर्जदाराने जाणीवपुर्वक उलटतपास न घेतल्याने सदर आदेश झाला असुन अर्ज फेटाळावा असे म्हटले.

४. माझे मते, उपरोक्त सर्व बाबी अभिलेखाचे संदर्भाने एकत्रीत विचारात घेता असे आढळते की, प्रस्तुत अर्ज २०२२ सालचा असुन तो वारस प्रमाणपत्रासाठी आहे, प्रस्तुत अर्जदार प्रतिवादक आहे, अशा परिस्थितीत सदर प्रकरण गुणावगुणावर निकाली करणेकामी सदर गैरअर्जदारास उलटतपासाची संधी देवुन त्यांची बाजु मांडण्याची रास्त संधी उपलब्ध करणेसाठी सदर अर्ज न्यायदृष्टीकोनातुन एक संधी

म्हणून मंजुर करणे उचित होईल.

५.  यास्तव, मी खालील आदेश पारीत करतो :

**आदेश**

गैरअर्जदाराविरुध्दचा 'उलटतपास नाही' आदेश न्यायदृष्टीकोनातून निष्कासित करण्यात येतो.

Digitally signed by JADHAV KIRAN SAHEBRAO
Date: 2025.01.16 17:54:45 +0530

(के. एस. जाधव)

दि.१६.०१.२०२५  सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, औरंगाबाद

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Syed Haroon |
| Name of the Court | : | Jt. CJSD Court, Aurangabad. |
| Order date | : | 16.01.2025 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 16.01.2025 |
| Order uploaded on | : | 16.01.2025 |